R.No. MHAMAR/25/A3029

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ८३

दि.१२ मार्च २०२६,वार: गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## मुरुड येथे नगरपरिषदेसह एमआयडीसी लवकरच मंजूर करून घेणार-आ.कराड

लातूर - सर्वांगीण विकासासाठी राज्यातील




महायुती शासनाच्या माध्यमातून मुरुड शहराला नगरपरिषदेचा दर्जा आणि विविध उद्योजक व सुशिक्षित बेरोजगारासाठी एमआयडीसी कार्यान्वित व्हावी यासाठी शासन स्तरावर कारवाई सुरू असून लवकरच मंजूरी मिळणार असल्याची माहिती भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी दिली.



नुकत्याच जाहीर झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात मुरुड ते पाडोळी या रस्त्यावर मुरुड गावातून सिमेंट कॉंक्रेट रस्ता आणि नाली बांधकामासाठी तब्बल सहा कोटी रुपयांचा निधी मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून मुरुड येथील भाजपा कार्यकर्त्यांनी आभार व्यक्त केले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, युवा मोर्चाचे राजकिरण साठे, मुरुड येथील सरपंच श्रीमती अमृताताई नाडे, भाजपाचे ग्रामपंचायत सदस्य महेश कणसे, सौ. लताताई भोसले, सुरज सूर्यवंशी, तात्या ईटकर यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, मुरुड शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मुरुड शहराला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून विविध लहान-मोठ्या उद्योजकासाठी आणि सुशिक्षित बेरोजगाराकरिता मुरुड येथे एमआयडीसी कार्यान्वित व्हावी यासाठी आपण प्रयत्नशील आहोत लवकरच मुरुडला नगर परिषदेच्या दर्जा मिळेल आणि एमआयडीसी मंजूर होईल अशी माहिती त्यांनी दिली.

मुरुड येथील शासकीय विश्रामगृह जीर्ण अवस्थेत झाले असून नवीन सुसज्ज विश्रामगृह मंजूर व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगून आ. रमेशअप्पा कराड यांनी विविध सामाजिक सभागृह, स्मशानभूमी यासह मुरुड शहराच्या विविध विकास कामांना येत्या काळात मान्यता मिळेल अशीही माहिती दिली. यावेळी मुरुड येथील नागरिकांशी संवाद साधून विविध विकासात्मक विषयावर आ. कराड यांनी सविस्तर चर्चा केली.

याप्रसंगी मुरुड येथील शुभम देवकर, बळी हिंगले, वैजनाथ हराळे, शब्बीर सय्यद, रवी ईटकर, मनोज धोत्रे, अक्षय भोसले, बापू दिवार, आकाश सापसोड, दत्ता कांबळे, कुणाल चव्हाण, दत्ता पुदाले, सुयश शिंदे, ऋषिकेश शिंदे, क्षणमती कोंडेकर, चंद्रकांत धिवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## खा.रजनीताई पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल

केज/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील जनता बेरोजगारी,महागाईने होरपळून निघत आहे.शेतकरी संकटाशी लढत आहेत ग्रामीण विकास मंत्रालयाने घोषणा केलेला अर्थसंकल्प कुचकामी आहे. घोषणा आणि वस्तुस्थिती यामध्ये खूप मोठे अंतर आहे. यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार आहेत काय?असा घणाघात कॉंग्रेसच्या खा.रजनीताई अशोकराव पाटील यांनी राज्यसभेत केला.




अर्थसंकल्पात ४ टक्के वाढ केल्यामुळे ग्रामीण भारताचे स्वप्न पूर्ण होणार आहे का ?

गाव हा भारताचा आत्मा आहे गाव विकसित झाले नाहीत तर विकासाचा दावा हा पोकळ आहे.

विकासाचा पाऊल उचलल्याचा सरकार दावा करत असले तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळी आहे.

या वाढीव अर्थसंकल्पाने शेतमजूर ,शेतकरी, बेरोजगार यांचे प्रश्न सुटणार आहेत काय असा सवाल उपस्थित केला.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे नाव बदलून जी रामजी केले मात्र हा कायदा रोजगार उपलब्ध करून देणार आहे काय असा प्रश्न उपस्थित केला. ग्रामीण जनतेसाठी आवश्यक असणाऱ्या योजनांमध्ये निधीत वाढ होण्याऐवजी कमी होत आहे ही बाब गंभीर असल्याचा निर्वाळा दिला.

## एमआयटी लातूर येथील श्री गणेश, श्री हनुमान, श्री महालक्ष्मी मंदिरे स्वधर्म आणि स्वत्वाचे प्रतीक

लातूर,- माईर एमआयटी शिक्षण



संकुल, लातूर येथे उभारण्यात आलेली श्री गणेश, श्री दक्षिणमुखी हनुमान व श्री महालक्ष्मी ही मंदिरे स्वधर्म आणि स्वत्वाचे प्रतीक आहेत. मंदिररूपी संस्कारातून परिसरातील विद्यार्थी व रुग्णांमध्ये सकारात्मकतेची भावना निर्माण होऊन भारतीय संस्कृती आणि मूल्ये अधिक दृढ होतील, असे प्रतिपादन माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केले.



एमआयटी शिक्षण संकुलातील श्री गणेश, श्री दक्षिणमुखी हनुमान व श्री महालक्ष्मी मंदिरांचे प्रा. डॉ. विश्वनाथ कराड व सौ. उषाताई विश्वनाथ कराड यांनी दर्शन घेतले तसेच 'विश्वधर्मी विश्वमैदान' क्रीडा संकुलाची पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी माईर एमआयटी शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री तुळशीराम दा. कराड, प्रगतिशील शेतकरी श्री काशिराम दा. कराड, एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड, रजिस्टार डॉ. रत्नदिप जोशी, संचालक डॉ. महेश थोरवे, संचालक प्रा. तेजस कराड आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रा. डॉ. कराड म्हणाले की, जीवनात कधीही अहंकार बाळगू नये. संत साहित्यामध्ये नम्रतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

अहंकाराचा वारा न लागो राजसा ।
माझ्या विष्णुदासा भाविकांसी ।।
नामा म्हणे तया असावे कल्याण ।
ज्या मुखी निधान पांडुरंग ।।

या संतवचनांमधून नम्रतेचा संदेश मिळतो. 'मला सर्वकाही कळते, मीच मोठा' हा भाव मनात आला की माणूस इतरांपासून दूर जातो. इतरांशी नाते दृढ ठेवायचे असेल तर अहंकार सोडणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी पुढे सांगितले की,

नवल अहंकाराची गोठी ।
विशेषें न लगे अज्ञानापाठीं ।
सज्ञानाचे झोंबे कंठीं ।
नाना संकटीं नाचवी ।।

अहंकार हा ज्ञानी माणसालाच अधिक ग्रासतो आणि त्याला विविध संकटांत अडकवतो. त्यामुळे जीवनात सर्वोच्च स्थानी पोहोचलात तरी नम्रता कायम ठेवली पाहिजे. आज जगभरात जे काही घडत आहे त्यातून आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित होते.

ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या तत्त्वांचे प्रतीक असलेली ही मंदिरे एमआयटी शिक्षण संकुलातील विविध वैद्यकीय व शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांची जाणीव करून देतात. त्याचबरोबर 'विश्वधर्मी विश्वमैदान' क्रीडा संकुलातून अनेक खेळाडूंना प्रेरणा मिळेल आणि येथून आदर्श खेळाडू घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या तीन दशकांपूर्वी माईर एमआयटी संस्था स्थापन झाली. 'विश्वशांती' हे संस्थेचे ब्रीद असून या संस्थेने विश्वशांतीचा विचार पुढे नेण्याचे कार्य हाती घेतले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

नम्र जाला भूतां ।
तेणें कोंडिलें अनंता ।।

या संतवचनाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, नम्रतेमुळेच अनंत शक्ती प्राप्त होते. भारतमातेची प्रगती साधायची असेल तर समाजानेही नम्रतेचा मार्ग स्वीकारला पाहिजे.

यावेळी माईर एमआयटी शिक्षण संकुलातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहतूक समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना महापौर, पोलीस अधिक्षक व आयुक्तांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांची बैठक

लातूर/प्रतिनिधी : वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी मनपाच्या वतीने कायमस्वरूपी उपाययोजनावर भर देण्यात आहे.त्या अनुषंगाने बुधवारी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी विशेष वर्किंग कमिटी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या



पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस महापौर जयश्री सोनकांबळे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, उपमहापौर स्नेहल उटगे,विरोधी पक्षनेते देविदास काळे, सभागृह नेते विजयकुमार साबदे, , परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांच्यासह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधावा.वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी अनियंत्रित पार्किंग, चौकामधील गर्दी कमी करणे, अतिक्रमणे हटविणे व वाहतुकीला शिस्त लावणे यावर चर्चा झाली.वाहतूक व्यवस्थापन प्रभावी करण्यासाठी यावेळी सर्वांनी सूचना मांडल्या.

शहरातील शहरात किमान १०० ट्रॅफिक वॉर्डनची नियुक्ती करावी. कार्यरत नसलेले वाहतूक सिग्नल, सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करावेत, ऑटोरिक्षा पॉईंट तसेच मनपाच्या शहर वाहतूक बसचे नियोजन यावरही चर्चा झाली. प्रत्येक चौकापासून किमान ५० मीटर अंतरापर्यंत नो पार्किंग/हॉल्टींग झोन करावा, ऑटोरिक्षा बस व सिटीबसचे थांबे निश्चित करावेत. विनापरवाना ऑटोंना शहरात परवानगी देऊ नये. बेकायदेशीर पार्किंग विरोधात कारवाई करावी.नो पार्किंग फलक, झेब्रा क्रॉसिंग तसेच वाहतूक चिन्हे अंधुक झाली असून त्यांचे नूतनीकरण करावे. शहरातील प्रमुख रस्ते वनवे करावेत.वाहतूक नियमांबाबत अधिसूचना काढावी. फ्री लेफ्ट टर्न ही संकल्पना अंमलात आणावी. अतिक्रमणावर कारवाई करावी.मनप्राच्या अतिक्रमण विभागाला पोलीस बंदोबस्त पुरविण्यात यावा. अनधिकृत जाहिरात फलक काढून टाकावेत. रस्त्यावर थांबून प्रवासी घेण्याचे प्रकार बंद करावेत. चौकात मध्यभागी बांधलेल्या संरचना काढून टाकाव्यात आदी सूचना यावेळी करण्यात आल्या.

राजीव गांधी चौकात राष्ट्रीय महामार्गावर भरणाऱ्या भाजी बाजाराची व्यवस्था करावी अशी सूचना देखील मांडण्यात आली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त पंजाब खानसोळे,वसुधा फड,उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, विधी अधिकारी,अतिक्रमण विभागासह सर्व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय...

# अकरावा दिवस : इराणइझ्राएल संघर्ष आणि गॅसचा भडका

मध्यपूर्वेत सुरू असलेला इराणइझ्राएल संघर्ष आता अकराव्या दिवशी पोहोचला आहे आणि या युद्धाने केवळ दोन देशांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण जगाला अस्वस्थ केले आहे. अलीकडील घडामोडींमध्ये गॅस साठ्यांवर किंवा ऊर्जा केंद्रांवर झालेल्या हल्ल्यांमुळे निर्माण झालेली भीती ही या संघर्षाला अधिक धोकादायक वळण देणारी ठरू शकते.

या संघर्षात सुरुवातीला क्षेपणास्त्र हल्ले आणि ड्रोन हल्ले दिसत होते; मात्र आता ऊर्जा संसाधनांवर परिणाम होऊ लागल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. गॅस साठे, तेल टर्मिनल्स आणि ऊर्जा पुरवठा व्यवस्था यावर होणाऱ्या परिणामामुळे केवळ युद्धभूमीवरच नाही तर जागतिक अर्थव्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मध्यपूर्व हा जगातील ऊर्जा पुरवठ्याचा कणा मानला जातो. त्यामुळे या भागातील कोणतीही लष्करी चकमक लगेच जागतिक बाजारपेठेला हादरवते. गॅस आणि तेलाच्या किमतींमध्ये वाढ होण्याची शक्यता आधीच व्यक्त केली जात आहे.

या संघर्षाच्या अकराव्या दिवशी घडलेल्या गॅससंबंधित स्फोटांच्या किंवा आगीच्या घटनांनी परिस्थिती किती नाजूक आहे हे स्पष्ट केले. ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले झाले तर त्याचा परिणाम सामान्य नागरिकांवरही होतो. वीजपुरवठा, उद्योग आणि वाहतूक यावर त्याचे दूरगामी परिणाम दिसू शकतात.

युद्धाचे सर्वात मोठे बळी नेहमीच सामान्य नागरिक ठरतात. बॉम्बहल्ले, क्षेपणास्त्रे आणि आता ऊर्जा केंद्रांवर होणारे हल्ले यामुळे सामान्य लोकांच्या सुरक्षिततेवर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. हजारो लोकांना आपली घरे सोडून सुरक्षित ठिकाणी जावे लागत आहे.

जागतिक स्तरावर अनेक देश या संघर्षाकडे चिंतेने पाहत आहेत. संयुक्त राष्ट्रांसह अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांनी दोन्ही देशांना संयम राखण्याचे आवाहन केले आहे. मात्र युद्धाची तीव्रता कमी होण्याऐवजी काही ठिकाणी ती वाढताना दिसत आहे.

या संघर्षाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याचे भू-राजकीय परिणाम. मध्यपूर्वेतील अनेक देश या परिस्थितीकडे लक्ष ठेवून आहेत. जर हा संघर्ष अधिक वाढला तर तो व्यापक प्रादेशिक युद्धात परिवर्तित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने ही परिस्थिती जगासाठी धोक्याची घंटा ठरू शकते. गॅस आणि तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला तर त्याचे थेट परिणाम अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर होऊ शकतात. विशेषतः ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसाठी ही चिंता अधिक मोठी आहे.

भारतासारख्या देशांसाठीही मध्यपूर्वेतील स्थैर्य अत्यंत महत्त्वाचे आहे. ऊर्जा आयात, व्यापार आणि तेथे काम करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा संघर्ष चिंतेचा विषय ठरतो.

युद्धाचा इतिहास सांगतो की कोणताही संघर्ष कायमस्वरूपी उपाय देत नाही. शेवटी संवाद आणि राजनैतिक मार्गानेच समाधानाचा मार्ग सापडतो. त्यामुळे या संघर्षातही शांततापूर्ण तोडगा निघणे अत्यंत आवश्यक आहे.

अकराव्या दिवसानंतरही परिस्थिती तणावपूर्णच आहे. गॅससारख्या महत्त्वाच्या ऊर्जा स्रोतांवर संकट निर्माण होऊ लागल्यास युद्धाची व्याप्ती आणि परिणाम दोन्ही वाढू शकतात.

जगाने या संघर्षातून एक महत्त्वाचा धडा घ्यायला हवा. ऊर्जा सुरक्षा, प्रादेशिक स्थैर्य आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य याशिवाय जागतिक शांतता टिकू शकत नाही.

आज गरज आहे ती संयमाची, संवादाची आणि शांततेच्या मार्गाची. कारण युद्ध जिंकले गेले तरी त्याची किंमत माणुसकीला चुकवावी लागते.

# भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याशी चर्चा.

महाराष्ट्रातील कलाल-कलार समाजाच्या उन्नतीसाठी सरकारने आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे यासाठी संघटना प्रयत्नशील आहे.याच अनुषंगाने दिनांक १० मार्च २०२६ ला राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांची महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने मुंबई येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी निवेदनाच्या माध्यमातून त्यांना विनंती करण्यात आली की, महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना गेल्या चार वर्षांपासून समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन व्हावे या उद्देशाने प्रयत्नशील आहे. परंतु सरकारने कलाल- कलार समाजाकरीता भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या बाबतीत अजुनपर्यंत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. त्याचप्रमाणे या अगोदर स्वर्गीय अजितदादा पवार यांनाही निवेदन देण्यात आले होते आणि त्यांनी आश्वासन दिले होते की महामंडळ स्थापन करण्याचा संपूर्ण प्रयत्न करील.दादांची इच्छा पुर्तत:व्हावी या अनुषंगाने संघटनेच्या माध्यमातून राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांना विनंती करण्यात आली की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून कलाल-कलार समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या उद्देशाने आपण प्रयत्न करावे व समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे. अशी विनंती निवेदनाच्या व चर्चेच्या माध्यमातून श्रीमती सुनेत्राताई पवार यांना करण्यात आली. त्याचप्रमाणे समाजाला पारंपरिक मद्य व्यवसाय देण्यात यावा इत्यादी विविध मागण्यांच्या संदर्भात निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजांच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने आपण सरकारच्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून द्यावा अशीही समाजाच्या वतीने मागणी करण्यात आली.यावेळी संघटनेचे अध्यक्ष सागर समुद्रवार,राज्य प्रवक्ता रमेश लांजेवार, सरचिटणीस संतोष खंबलवार,कार्याध्यक्ष रविंद्र हटवार, महिला अध्यक्षा सिमा खंबलवार, संभाजी हटेवार सह अनेक मान्यवर उपस्थित होते यामध्ये ऍड.राजेश जैस्वाल,संजय हिवाळे, संजय हटवार, भास्कर झगेकर, मनोज मेश्राम, दिपाली लोहकरे, अनिता कावरे,सिमा मेश्राम, महेंद्र शेंडे, गणेश करूटले, अनिल टाकर्डे, प्रदीप कुरवाळे, किशोर कावरे, दिपक उके, बाळासाहेब लाळे, नितिन मेश्राम, गणेश नाईक, प्रदीप गजवार, विवेक बाबुळवार,शाम करोडदे,मछेंद्र कछवे,बाबासाहेब अपशिंदे, कैलास सोनवणे प्रामुख्याने उपस्थित होते
.

**विनित**
**रमेश लांजेवार**
**(राज्य प्रवक्ता)**
**महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# गावात आईला प्यायला पाणी नाही.आगरी कोळी ओबीसी तरुण क्रिकेटमग्न..?? राजाराम पाटील.

जगात तेलासाठी तिसरे महायुद्ध भडकतेय.इस्रायल अमेरिका जागतिक आंतरराष्ट्रीय कायदे धाब्यावर बसवून जगावर युद्ध लादू पाहतेय.लोकशाही आणि हुकुमशाही यातला फरक भारतीय पंतप्रधान मंत्रिमंडळ यांना कळेनासं झाला आहे.हजारो वर्षांचा भारत मित्र इराण (पर्शिया)यांना आम्ही भारतीय विसरलो. शीिीिळप फाइल मध्ये अत्यंत विकृत कोवळ्या मुलींच्या शोषणात अडकलेल्या अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प आणि मोदी सुद्धा यांच्या महापांकडे दुर्लक्ष केल्याने आपला स्वयंपाक आणि हॉटेल मधला गॅस संपत आलाय.

युद्धाचा थेट परिणाम आमच्या घरापर्यंत पोहचला.या आंतरराष्ट्रीय इराण आणि अमेरिकन युद्धाची चर्चा क्रिकेट कॉमेंट्रीमध्ये नाही.अशा बुद्धिहीन विवेकशून्य तरुण भारताची अवस्था प्रत्यक्ष युद्धात काय असेल?कारण भारतात डिझेल पेट्रोल स्वयंपाक गॅस इतकेच प्यायचे पाणी सुद्धा महत्वाचे आहे.मागच्या आठवड्यात मी माझ्या अलिबाग तालुक्यात प्रवास केला.मुंबईला लागून असलेल्या आणि तिसरी मुंबई म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केलेल्या. पनवेल उरण पेण अलिबाग रायगड जिल्ह्यात प्यायला पाणी नाही .ही विदारक स्थिती मी प्रत्यक्ष पाहिली. प्रत्येक गावाबाहेर आगरी कोळी कराडी भंडारी ओबीसी तरुण क्रिकेट मॅच खेळत आहेत.क्रिकेट मॅच रंगात आल्यात.परंतु गावात भीषण पाणी टंचाई आहे.दोष कुणाचा?

स्वतःचा आई बहिणीच्या डोळ्यातलं पाण्याच्या दुष्काळामुळे आलेलं पाणी ज्यांना दिसत नाही.अशा तरुणांना पुत्र,भाऊ,पती,पिता,नेता कोणत्या नात्याचे पुरुष म्हणायचे? हाच तो रायगड जिल्हा जेथे छत्रपती शिवरायांनी आपली राजधानी बांधली.समुद्राच्या पाण्याची भरती ओहोटी जानणाऱ्या या आगरी कोळी भंडारी सागरपुत्र आरमारी राजाने, जागतिक सत्ता असलेल्या इंग्रज फ्रेंच मोघल यांना सागरी आरमाराचा हिसका दाखवून समुद्रात बुडविले होते.हे मराठा आरमार नव्हते.ते सागरी ओबीसी शूद्र आगरी कोळी भंडारी आरमार होते. इथल्या ओबीसी तरुणाईला घेऊन लढणारा हा रयतेचा राजा जमीनवरच्या आणि समुद्रातल्या पाण्याबरोबरच देशातल्या समस्त स्त्रियांच्या डोळ्यात पाणी येऊ नये.त्यांची इज्जत हीच राष्ट्राची शान आहे.असा राष्ट्रवाद सांगून गावातल्या प्रत्येक जिजाऊ एकवीरा यांच्यासाठी मैदानात, तरुणांना रक्त सांडण्यासाठी तानाजी मालुसरे आणि शिवा काशिद होण्यास प्रोत्साहित करत होता.

छत्रपती शिवरांचे रयतेचे स्वराज्य बुडवून आलेली मनुवादी पेशवाई ही आम्हास म्हणजे आगरी कोळी कराडी भंडारी कुणबी या शूद्र लोकांस पाणी, जमीन ,जंगल नाकारत होती.छत्रपती शिवराय यांची समाधी शोधून त्यांचा स्त्री शूद्र अतिशूद्र रयतेचा विचार महाराष्ट्राला सांगणारे महात्मा जोतिबा फुले.त्यांनी महाराष्ट्रात प्रथम पाण्यासाठी विहिरी आमच्या शूद्र अतिशूद्र यांच्यासाठी मोकळ्या केल्या.शिक्षण ब्राह्मण मुक्त करून, आमच्यासाठी स्त्री शिक्षणाची सुरुवात माता सावित्रीमाई यांच्या कडून केली.तेव्हा कुठे होती सरस्वती? यांचं सावित्री ज्योती फुले यांना आपले गुरु म्हणून भारताचे संविधानकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळे आंदोलन रायगड जिल्ह्यात चेतविले.निसर्गाचे,पावसाचे पाणी हा सर्व प्राणी,पक्षी आणि मानव यांचा नैसर्गिक अधिकार असताना. त्यावर मनुस्मृती धर्माने केवळ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांची हुकुमशाही लागू करणारा वैदिक ब्राह्मणी धर्म फाडून टाकणारा,शिवरायांचा मावळा म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आबेडकर होय.त्यांना कोकणात साथ देणारे आरमारी मावळे म्हणजे आगरी कोळी भंडारी ओबीसी तरुण होते. हा आमचा इतिहास आहे.

आज याच रायगड जिल्ह्यात पाण्याचा दुष्काळ सुरू झालाय.तरुण गावाबाहेर क्रिकेट खेळतात.त्यांना घरातला प्रश्न कळत नसेल? तर इराण अमेरिका तेल प्रश्न कसा कळणार?. परंतु युद्ध भारताच्या समुद्र किनाऱ्याजवळ पोहचले आहे.इराणचे नौदल लढाऊ जहाज अमेरिकेने जागतिक युद्ध नियम मोडून श्रीलंकेजवळ बुडविले. आपल्याकडे पाहुणे म्हणून आलेल्या इराणच्या लोकांना मदत नाकारणे, भारतासाठी ही लाजिरवाणी गोष्ट आहे. कुठे गेले अतिथी देवो भव? शीिीशिळप फाइल या जागतिक लफड्यात पूर्ण अडकलेले आपले पंतप्रधान यावर बोलू शकत नाहीत?. परंतु देशाला धोका आहे.हे आम्ही ओबीसी तरुणाईने ओळखले पाहिजे.या युद्धामुळे पेट्रोल डिझेल स्वयंपाक गॅस यांचा तुडवडा दिसू लागला आहे.महागाई भडकतेय. लोकसभेत चर्चा सुरू झाली.रायगडची आगरी कोळी ग्रामसभा गावकी यावर चर्चा करणार की नाही?.

आम्ही छत्रपती शिवराय महात्मा फुले डॉ बाबासाहे आंबेडकर यांच्या मार्गाने जाणार नसू ?तर देश धोक्यात आहेच. परंतु आपले घर गावठाण धोक्यात आहे. हे ओबीसी तरुणाईने जाणले पाहिजे.या देशात आमचे हक्कांचे पाणी जमीन जंगल शिक्षण आरक्षण राजकीय सत्ता चोरमारे उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आहेत.हे मनुस्मृती धर्माचे कटू सत्य आगरी नेते नारायण नागू पाटील यांनी चरी अलिबाग येथील जागतिक शेतकरी संप करून आम्हास सागितले. रायगड जिल्ह्यातील चरी शेतकरी संप. चिरनेर जंगल सत्याग्रह,चवदार तळे पाणी हक्क आंदोलन,मनुस्मृती दहन या संघर्षात आम्ही आगरी कोळी भंडारी कुणबी ओबीसी उच्चवर्णीय ब्राह्मण मराठा वैश्य यांच्या हुकुमशाही विरोधात लढणारे छत्रपती शिवरांचे आरमारी मावळे आहोत.कोकणात धो धो पाऊस पडतो.हे पाणी आम्ही का जपत नाही?. घराजवळ जमिनीत टाक्या,विहिरी शेतकी तळे बाधून पाणी का साठवीत नाही?. हा प्रश्न मनाला विचारा. रायगड किल्ला त्यातील पाणी व्यवस्थापन पहा,बौद्ध लेणी त्यातील २००० वर्षे जुनी पाणी व्यवस्था पहा.त्याच बरोबर पश्चिम महाराष्ट्रात ६०टक्के पाणी ऊसाच्या पिकाला पळवणारे उच्चवर्णीय मराठे सत्ताधारी समजून घ्या.

ओबीसी तरुणांनी ही पहावे कोकणातली धरणे गाळ साचून भरली? त्यातील पैसे खाणारे चोर पकडा.. सत्तर हजार कोटींचे पाणी चोर कुणी सोडले?.ब्राह्मण मराठा राजकीय युती आजही आम्हास पाण्यासाठी आमची गावठाणे उपाशी ठेवत असेल?,तर परखड बोलायला शिका.मोबाईल घेऊन फेसबुक लाईव्ह करून गावातला पाणी प्रश्न पंतप्रधान,मुख्यमंत्री,आमदार खासदार यांना दाखवा.माझ्यासाठी नाही.तुमची आई,बहीण,मावशी,आजी,पत्नी,मैत्रीण या घरातल्या आई एकवीरा, राजमाता जिजाऊ,क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि तुमच्या माझ्या आईसाठी..भारत माते साठी.क्रिकेट मॅच थांबवून पाणी प्रश्नावर लढू या..चवदार तळे आंदोलन आठवून डॉ.बाबासाहे आंबेडकरांचा पाणी विचार घरा घरात पोहचवू या..

**जय एकवीरा.जय जिजाऊ.जय भीम.जय भारत.जय संविधान.**
**राजाराम पाटील-**
**८२८६०३१४६३.**
**उरण जिल्हा - रायगड.**

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकांसाठी आता नवीन सेवार्थ प्रणाली;जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकारी यांना प्रशिक्षण

लातूर : जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, आस्थापनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची वेतन देयकासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी नवीन सेवार्थ प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यामध्ये पेपरलेस पद्धतीने केवळ ऑनलाईन वेतन देयके दाखल करावी लागणार असून वेतन देयक प्रक्रिया अधिक सुलभ, जलद व पारदर्शक होणार आहे. या प्रणालीच्या वापराबाबत माहिती देण्यासाठी लातूर जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत १० मार्च २०२६ रोजी दोन सत्रात जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित या प्रशिक्षणाला लातूर जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालयातर्फे अधिनस्त असलेल्या आहरण व संवितरण अधिकारी, लेखा विषयक काम पाहणारे कर्मचारी यांना जुन्या सेवार्थ प्रणालीतून नवीन सेवार्थ प्रणालीत डाटा ट्रान्स्फर करण्यापूर्वी माहिती अद्ययावत करणे, पदांची पडताळणी, नवीन सेवार्थ प्रणालीमधील माहितीची पडताळणी




याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी सकाळच्या सत्रात झालेल्या प्रशिक्षणाला अहमदपूरच्या उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांची प्रमुख उपस्थिती होती. दुपारच्या सत्रात जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अपर कोषागार अधिकारी मा. रो. गुटे, ख. नै. खोजे, ना. ए. बुध्दिवंत यांच्यासह जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

मास्टर ट्रेनर्स यांनी केले मार्गदर्शन- नवीन सेवार्थ प्रणालीमुळे वेतन देयकाची मुद्रित प्रत कोषागारात सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. वेतन देयके ई-स्वरुपात पाठविण्यात येणार असून सदर देयके आधार बेस ओटीपीद्वारे ई-हस्ताक्षर करुन करण्यात येणार आहेत. यामुळे वेतन देयक प्रक्रिया अधिक सुलभ, जलद व पारदर्शक होणार आहे. नवीन सेवार्थ प्रणालीसंदर्भातील सविस्तर प्रशिक्षण मास्टर ट्रेनर्स उपकोषागार अधिकारी (सं) आर. डी. माने, तांत्रिक सहाय्यक शिवलिंग उटगे यांनी दिले. यावेळी पीपीटीद्वारे नवीन सेवार्थ प्रणाली वापराचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकारी, कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ उर्फ नाना यांचे कार्य आणि विचार पुढील पिढीसाठी प्रेरणादायी, नाना देहाने नसले तरी विचारांनी सदैव सोबत गणेशराव वाघ

बीड/प्रतिनिधी.–जीवनात कार्य करताना अडचणी येतातच; मात्र खचून न जाता खंबीरपणे लढत राहणे हेच यशाचे खरे गमक आहे. शिक्षणमहर्षी गोविंदराव वाघ उर्फ 'नाना' यांनी दिलेली ही प्रेरणादायी शिकवण आजही समाजाला मार्गदर्शक ठरत आहेत. म्हणूनच नानांच्या विचारांचा आणि कृतीचा वारसा घेऊन त्यांनी सांगितलेल्या सन्मार्गानेच आपण आपले काम करत राहू. नाना आज देहाने आपल्यात नसले तरी विचाराने आपल्यासोबत कायम आहेत, असे भावूक प्रतिपादन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेशराव वाघ यांनी शिक्षणमहर्षी गोविंदराव वाघ 'नाना' यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून

बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सुदामतीताई वाघ (मोठ्याबाई), नामदेवराव वाघ, बाळासाहेब धुमाळ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ यांच्या जयंतीच्या निमित्ताने शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने रविवार दिनांक ८ मार्च रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षण महर्षी स्व. गोविंदराव वाघ उर्फ नानांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर काही निवडक मान्यवरांनी नानांच्या संपूर्ण आयुष्यावर, कार्यावर विचार मांडले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना गणेशराव वाघ सर यांनी शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ उर्फ नाना यांचे संपूर्ण जीवन चरित्र उपस्थितांच्या समोर उलगडले. यावेळी बोलताना गणेश वाघ सर म्हणाले की, बीड तालुक्यातील



नाळवंडी सारख्या ग्रामीण भागातून शिक्षक म्हणून नानांनी आपल्या कार्याची सुरुवात केली. यावेळी त्यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अडचणी जवळून अनुभवल्या, सुविधांच्या अभावामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे पाहून त्यांनी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. नानांच्या विचारांवर थोर साधू संत– महंत, छत्रपती श्री शिवाजी महाराज, महात्मा गांधी, महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या थोर महापुरुषांच्या विचारांचा मोठा पगडा होता. महात्मा गांधीजीच्या विचारा प्रमाणे नानांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी होती. नानांनी शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून केवळ शिक्षणाचा प्रसार केला नाही, तर अनेकांना रोजगाराची संधीही उपलब्ध करून दिल्या आहेत. नानांच्या ठायी असलेली गोरगरीब विद्यार्थ्यांबद्दलची कणव, दातृत्व आणि आपुलकी यामुळे त्यांचा मोठा मित्रपरिवार आणि चाहतावर्ग निर्माण झाला आहे. त्यामुळे शेकडो आजी–माजी विद्यार्थी आजही नानांना प्रेरणास्थान मानतात. त्यांच्या या कार्यात त्यांच्या सहचारिणी सुदामतीताई वाघ (मोठ्याबाई) यांचेही मोलाचे योगदान राहिले आहे. गोरगरीब वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बाई आणि नाना यांनी आपले आयुष्य समर्पित केले आहे. बाई– नाना यांच्या या कार्याची दखल घेऊन समाजातील सुज्ञ नागरिक या दोघांनाही आधुनिक काळातील 'फुले दांपत्य' असे संबोधतात. नाना शेवटपर्यंत शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहिले होते. संपूर्ण हयात शिक्षण क्षेत्रासाठी समर्पित करणाऱ्या शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ उर्फ नानांचे विचार आज क्षणाक्षणाला आठवतात. जीवनात काम करताना खूप अडचणी येतात; मात्र त्यावेळी खचून न जाता खंबीरपणे लढत राहणे हेच यशाचे खरे गमक आहे असे नाना सर्वांना आवर्जून सांगत असत. नाना

आज देहाने आपल्यात सोबत नाहीत परंतु विचाराने कायम आपल्या जवळच आहेत. 'नानांनी दिलेली प्रेरणादायी शिकवण, विचार आणि त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य आजही आपल्या सर्वांना मार्गदर्शक ठरत आहे. त्यांच्या जयंतीदिनी त्यांच्या विचारावर आणि आदर्शावर वाटचाल करणे हीच ख–या अर्थाने नानांना आदरांजली ठरेल अशा शब्दात गणेशराव वाघ सर यांनी आपल्या भावना व्यक्त केला. या कार्यक्रमाला आजी– माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक, यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चुरशीच्या लढतीत कोल्हापूरचा रोहन पवार ठरला महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी किताबाचा मानकरी



लातूर:– कोल्हापूर येथील रोहन पवार आणि पुण्याचा रामा कांबळे यांच्यातील चुरशीच्या लढतीत रोहन पवार याने ११ अंकाने राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी हा खुल्या गटातील किताब मिळविला. सव्वा लाख रुपये रोख, चांदीची गदा, सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक – दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) च्या पवित्र यज्ञ भूमीवर विश्वातील एकमेव मानवतातीर्थ भवनाच्या विशाल प्रांगणात अभूतपूर्व राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा–२०२६ आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धा गेल्या १९ वर्षापासून भरविण्यात येत आहेत. या स्पर्धेत पुण्याचा रामा कांबळे यांनी उपविजेते पद मिळविले. त्यांना रौप्यपदक व रोख रुपये १ लाखाचे पारितोषिक देण्यात आले. कोल्हापूर येथील सुशांत तांबुळकर याला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. त्याला रुपये ५० हजार रोख व कांस्य पदक देण्यात आले. चतुर्थ क्रमांकावर पुणे येथील सागर देवकाते याला २५ हजार रुपये रोख व पदक देण्यात आले.

या स्पर्धेत एकूण २५० पेक्षा अधिक मल्लांनी भाग घेतला होता. हिंदी केसरी दिनानाथ सिंग, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी पुणेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, रामेश्वरचे माजी सरपंच श्री. तुळशीराम दा. कराड, श्री. काशीराम दा, कराड, आ. रमेशअप्पा कराड, डॉ. हनमंत कराड, श्री. राजेश कराड, पै. विष्णूतात्या जोशीलकर, महाराष्ट्र केसरी आप्पासाहेब कदम, बापू साहेब मोरे, माईर्सचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी व प्रा. विलास कथुरे यांच्या हस्ते विजेत्या मल्लांना पारितोषिक देण्यात आले. या वेळी पै. राहुल बिराजदार आणि पै. निखील वणवे हे उपस्थित होते.

वजन गटातील विजेते पुढील प्रमाणे –प्रथमः सुवर्ण पदक, द्वितीय रौप्य पदक, तृतिय कांस्य पदक, व रोख रक्कम पुढे दिल्या प्रमाणे वजन गट प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक, चुतर्थ क्रमांक रक्कम २०,०००; १५,०००; १०,०००; ८,००० याप्रमाणे ८६ किलो शुभम मगर, पुणे गौतम शिंदे, सोलापूर तुषार लवटे, लातूर तुषार झंजे सोलापूर ७४ किलो नामदेव कोकाटे, पुणे सोमनाथ शिंदे, करमाळा तेजस गोफणे सातारा समाधान भोसले धाराशिव ७० किलो शनि निंबाळकर, पुणे कुलदीप पाटील, कोल्हापूर महेश तातपुरे, रामेश्वर तुषार खामकर, पुणे ६५ किलो अविराज माने, सोलापूर चेतन भंडारी, रामेश्वर किरण सगे, पुणे बाळासाहेब चौरे, रामेश्वर ६१ किलो आविष्कार गावडे, पुणे अनिकेत पाटील, कोल्हापूर दिपक पवार, पुणे नारायण दहिफळे, रामेश्वर ५७ किलो आकाश सलगर, सोलापूर अजय निंबाळकर, पुणे लकी खरात, पुणे अनिकेत क्षिरसागर, बीड ७५ पेक्षा अधिक वर्षे वय असलेले अनेक मल्ल सहभागी झाले होते. या पैकी कोंड येथील शिवाजी गणपत मोरे हे विजेते ठरले तर कमलाकर माणिकराव मुळे हे उपविजेते ठरले. या पैलवानांचा योग महर्षी स्वातंत्र्य सेनानी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलार मामा स्मृती सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके देऊन सत्कार करण्यात आला.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मानवतातीर्थ भवन रामेश्वर रुई च्या मातीतून आज ना उद्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू निर्माण होतील. भारताच्या कुस्तीक्षेत्रामध्ये आपले नाव उज्वल करतील. कुस्ती या क्रीडा प्रकारात आपले मन आणि मनगट मजबूत होते. आजच्या तरुणांनी कुस्तीकडे वळणे गरजेचे आहे. श्री. बाबा निम्हण यानी स्र्धेचे सूत्रसंचालन व धावते वर्णन केले. डॉ. महेश थोरवे यांनी आभार मानले.

# दुर्गेच्या रूपातील महिलाच इतिहास घडवतात – पद्मश्री दादा लाड

लातूर / प्रतिनिधी : एक स्त्री म्हणून महिला कुठेही कमी नाहीत. महिलांमध्ये संकल्प करून ते पूर्ण करण्याची जिद्द असते.अशी जिद्द ठेवणाऱ्या दुर्गांच्या रूपातील महिलाच इतिहास घडवतात,असे प्रतिपादन पद्मश्री श्रीरंग (दादा) देवबा लाड यांनी केले.



भारत विकास परिषदेच्या वतीने पंचसूत्री गौरव पुरस्कार २०२६ चे वितरण पद्मश्री दादा लाड यांच्या हस्ते करण्यात आले. पुरस्कार वितरणानंतर मार्गदर्शन करताना दादा लाड बोलत होते. व्यासपीठावर भारत विकास परिषदेचे प्रांताध्यक्ष अमित कुलकर्णी,लातूर शाखेचे अध्यक्ष सुयोग जोशी, सिद्धेश्वर शाखेचे अध्यक्ष विशाल अयाचित, सौ.वृषाली जोशी व सौ.महादेवी मठपती यांची प्रमुख उपस्थिती होती. संपर्क, सहयोग, संस्कार, सेवा, समर्पण या पंचसूत्रीवर आधारित पुरस्कारांचे वितरण या कार्यक्रमात करण्यात आले.

यावेळी श्रीमती अन्नपूर्णा हनुमंत लादे, श्रीमती कविता सुरेश गोबाडे, सौ.दीपा सुरेश पाटील, श्रीमती सरोजाताई बोधनकर, सौ. रुपाली श्रीपाद देशपांडे यांना पंचसूत्री गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.शाल,श्रीफळ, पुष्पहार व सन्मानपत्र देऊन दादा लाड यांच्या हस्ते आपापल्या क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना दादा लाड यांनी सांगितले की, राष्ट्रहित आणि राष्ट्रभक्तीसाठी वेगळे काही करावे लागत नाही.आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्यात राष्ट्राचे हित पाहणे हीच राष्ट्रभक्ती आहे. ज्याला आपल्या कामात राष्ट्र दिसते तो खरा राष्ट्रभक्त होय,असे ते म्हणाले.कापूस, ज्वारी, गहू या क्षेत्रात केलेल्या विविध संशोधनांची माहितीही त्यांनी यावेळी बोलताना दिली.

प्रांताध्यक्ष अमित कुलकर्णी यांनी भारत विकास परिषदेच्या कार्याची माहिती दिली. पुरस्कारार्थींच्या वतीने कविता गोबाडे यांनी मनोगत व्यक्त केले. लातूर शाखाध्यक्ष सुयोग जोशी यांनी प्रास्ताविक केले. विशाल अयाचित यांनी दादा लाड यांचा परिचय करून दिला. तसेच भारत विकास परिषदेच्या दोन्ही शाखांच्या वतीनेही पद्मश्री लाड यांना सन्मानित करण्यात आले. सौ. डॉ. आरती संदिकर, सौ.उमा देशपांडे, सौ.स्मिता मलवाडे, सौ.श्वेता अयाचित, सौ.अनुराधा बेळंबे यांनी पुरस्कारार्थी चा परिचय करून दिला.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.धन्वंतर देशपांडे यांनी वंदे मातरम सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित पाटील व जयदीप कोरे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बुद्धिस्ट मायनॉरिटी मिशन'ची राज्यस्तरीय बैठक संपन्न; बौद्ध अल्पसंख्याक प्रमाणपत्रासह पाच ठराव मंजूर

ठाणे : रविवार दि. ८ मार्च २०२६ रोजी बुद्धिस्ट मायनॉरिटी मिशन ची राज्यस्तरीय बैठक ठाणे येथे पार पडली. या बैठकीस राज्यातील सुमारे २५ जिल्ह्यांतील प्रतिनिधी व सदस्य उपस्थित होते. या बैठकीचे अध्यक्षस्थान राजाभाऊ कदम यांनी भूषवले.यावेळी सेवानिवृत्त मंत्रालय अधिकारी रमेश धिवारे यांनी बुद्धिस्ट मायनॉरिटी मिशनची भूमिका स्पष्ट करताना अल्पसंख्याक संकल्पनेचा ऐतिहासिक संदर्भ मांडला. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजासाठी केलेल्या राजकीय व सामाजिक हक्कांच्या मागण्यांचा आढावा घेतला. धर्मांतरित बौद्ध समाजाला १९९२ मध्ये केंद्र सरकारकडून अल्पसंख्याक दर्जा मिळाल्यामुळेच संघटनेच्या नावात 'मायनॉरिटी' हा शब्द समाविष्ट करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीत मिशनची केंद्रीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये राजाभाऊ कदम (अध्यक्ष), ड.अरियं बौद्ध (कार्याध्यक्ष), रमेश धिवारे (सरचिटणीस), ड.. अशोकराज मोहोड (मुख्य सल्लागार), ड.वर्षाताई



कांबळे (सचिव) आणि योजनताई लोखंडे (खजिनदार) यांची निवड करण्यात आली. तसेच राज्यातील आणि जिल्ह्यातील विविध विभागांसाठी अध्यक्ष,उपाध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. दरम्यान, बैठकीत बौद्ध अल्पसंख्याकांच्या हितासाठी पाच महत्त्वाचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. त्यामध्ये राज्य सरकारकडून बौद्ध अल्पसंख्याक प्रमाणपत्र देणे, धार्मिक अल्पसंख्याकांना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देणे, अल्पसंख्याकांवरील अन्याय–अत्याचार रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा करणे, विधानमंडळात अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करणे आणि जिल्हा अल्पसंख्याक समित्यांवर बौद्ध समाजाला प्रतिनिधित्व देणे या मागण्यांचा समावेश आहे. यावेळी राजाभाऊ कदम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत बौद्धमय करण्याचा केलेला संकल्प पूर्ण करण्यासाठी बौद्ध समाजाने संघटित होऊन काम करण्याचे आवाहन केले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठकीची सांगता करण्यात आली.महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिव्यवस्थेचे समूळ उच्चाटन करून भारत बौद्धमय करण्याचा संकल्प केला होता. बौद्ध समाजाला मिळालेला अल्पसंख्याक दर्जा हा त्या संकल्पाच्या पूर्ततेसाठी मोठी संधी आहे. या संधीचा योग्य वापर करून बौद्ध समाजाने संघटित होऊन आपल्या हक्कांसाठी पुढे यावे आणि सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात प्रगती साधावी.

# स्वतंत्र मजदूर युनियनचे संस्थापक अध्यक्ष मा.डी.बी.वानकर यांचे दु:खद निधन.

मा. ज्ञानेश्वर बळीराम वानकर उर्फ डी.बी.वानकर यांचे मंगळवार दिनांक १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता वयाच्या पंच्यात्तराव्या वर्षी दुःखद निधन झाले. ते आकाशदर्शन बैकवर्ड क्लासेस एम्प्लॉईज असोसिएशन चे संस्थापक महासचिव त्याचप्रमाणे स्वतंत्र मजदूर युनियनचे सुद्धा ते संस्थापक अध्यक्ष होते. आकाशवाणी नागपूर, दूरदर्शन नागपूर आणि आकाशवाणी लखनऊ या केंद्रांवर त्यांनी विविध पदांवर कार्य केले आहे. फुले आंबेडकरी कामगार चळवळीचे देशातील एक अग्रगण्य पुढारी म्हणून त्यांची ख्याती होती. ते एक उत्तम वक्ता आणि उत्तम संघटक म्हणून ते सुपरिचित होते. राजकीय,सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक चळवळीतील देशातील अनेक गणमान्य लोकांशी त्यांचे जवळचे संबंध होते. त्यांच्या निधनाने देशातील फुले आंबेडकरी कामगार चळवळीचा एक खंबीर नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे.त्यांना स्वतंत्र मजदूर युनियन व सर्व संलग्न संघटनांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.



# जिल्हा परिषद शाळेचा उपक्रम; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, विद्यार्थिनींच्या सादरीकरणाने रंगला कार्यक्रम



केज/प्रतिनिधी –जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळा आवसगाव यांच्या वतीने महिलांसाठी उखाणे स्पर्धा तसेच शालेय विद्यार्थिनींच्या विविध कलागुणांचे सादरीकरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात गावातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित जिल्हा परिषद शाळेतील आदर्श शिक्षिका तसेच पालक प्रतिनिधी यांच्या शुभहस्ते स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

यावेळी महिलांनी आई मायेचा सागर या पेटीवरील गीताचे सुंदर सादरीकरण केले तसेच काही महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. शालेय विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. तसेच विद्यार्थिनींनी जन्म बाईचा आणि बाईपण भारी देवा या गीतांवर आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यानंतर उखाणे स्पर्धेस सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत जवळपास ४० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सर्वाधिक उखाणे सादर करत प्रथम क्रमांक श्रीमती गंगासागर श्रीकृष्ण शिनगारे यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक श्रीमती छाया सोमनाथ पोतदार यांनी मिळवला. तर जास्त शब्दांचा मोठा उखाणा सादर केल्याबद्दल उत्तेजनार्थ पारितोषिक श्रीमती मोहरबाई जीवन शिनगारे व श्रीमती उषाबाई भरत साखरे यांना देण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीप्रिय आदर्श शिक्षिका श्रीमती साठे मॅडम, श्रीमती कुलकर्णी मॅडम व श्रीमती जाधव मॅडम यांच्या पुढाकारातून करण्यात आले. यावेळी उपस्थित माता–भगिनींना महिला सक्षमीकरण, शिक्षणाचे महत्त्व व महिलांच्या सर्वांगीण विकासाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित महिलांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती साठे मॅडम यांनी केले. महिलांना विशेष मार्गदर्शन श्रीमती जाधव मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जाधव मॅडम यांनी केले. जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका श्रीमती कुलकर्णी मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले व सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# उमरी कारखान्याजवळ कारची समोरासमोर धडक ५ पाच जण जखमी




केज/प्रतिनिधी □अहमदपूर –अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील केज तालुक्यातील कदमवाडी शिवारात दोन कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात पाच जण जखमी झाले आसून, त्या पैकी दोघांना पुढील उपचारासाठी बीडला पाठविण्यात आले आसून तिघांवर केज येथील उप जिल्हा रुग्णालयात उपचार चालु आहेत.

हा अपघात मंगळवारी (दि.१० मार्च २०२६ दुपारी १२–०० वाजण्याच्या दरम्यान कदमवाडी शिवारात घडला. रिलायन्स पवन ऊर्जा कंपनीत सुरक्षा रक्षकांचे पर्यवेक्षक म्हणून कार्यरत असलेले माजी सैनिक मधुकर बालासाहेब गायकवाड रा. चिंचोली माळी, आणि त्यांचे सहकारी सिद्धेश्वर देवसन आदमाने रा. बीड हे स्विफ्ट डिझायर क्र. एमएच–४४ एस–७४३२ या कारने बीडकडे जात होते.

तर त्याच वेळी बीडकडून केजकडे येणारी टाटा अल्टो क्र. एमएच–२३ बीएच–६५६६ कार या दोन्ही कारची कदमवाडी शिवारात समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात टाटा अल्टो कारमधील शिवराज रविंद्र माने, रवि संतराम शिंदे व अनिल आत्माराम मोरे हे तिघे तर स्विफ्ट डिझायर कार मधील मधुकर बालासाहेब गायकवाड व सिद्धेश्वर देवसन आदमाने हे दोघे आसे एकूण पाच जण जखमी झाले आहेत.

या अपघाताची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक प्रल्हाद चव्हाण, जमादार संतोष गित्ते, शिवाजी कागदे, तांबारे, चालक रामहरी शिंदे, नितीन मेटे व गृहरक्षक दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी जाऊन . रुग्णवहीकेचा चालक सुमित तेलंग यांच्या मदतीने पाच ही जखमींना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# केज येथे मराठवाडा साहित्य परिषदेकडून माजी कुलगुरू डॉ जनार्दन वाघमारे यांना श्रद्धांजली.



केज/प्रतिनिधी.– केज येथे मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने माजी कुलगुरू दिवंगत जनार्दन वाघमारे श्रद्धांजली पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम माजी कुलगुरू जनार्दनजी वाघमारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमात माजी कुलगुरू जनार्दनजी वाघमारे यांच्या पुस्तकाचे इंग्रजी भाषेत रूपांतर करून त्यांचे विचार प्रकाशित करणारे प्रा. डॉ. सुनील राऊत यांनी वाघमारे सरांच्या जीवन चरित्रावर विस्तारित स्वरूपात मांडणी केली . सोबतच मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने या कार्यक्रमात जागतिक महिला दिन साजरा केला. महिलांचे सद्यस्थिती सामाजिक वास्तव , दाहकता व भविष्यकालीन समस्या या विषयावर जेष्ठ कवियत्री सौ.सीमाताई गुंड यांनी आपले मत प्रखरपणे मांडले. मराठवाडा साहित्य परिषदेचे सक्रिय सदस्य सामाजिक ह

कार्यात अग्रेसर असणारे व्यक्तिमत्व प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांची नुकतीच शाश्वत विकास परिषद नवी दिल्ली येथील प्रशिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला . शाश्वत विकासावर बोलत असताना प्राचार्य डॉ. सौदागर यांनी पर्यावरणातील जैविक अजैविक घटक परस्परांवर अवलंबून आणि गरजेचे आहेत यातील एकाचाही नाश झाला तरी त्याचा परिणाम भविष्यामध्ये दुसऱ्या घटकावर होऊ शकतो, यासाठी मानवाच्या शाश्वत विकासासाठी हे दोन्ही घटक अबाधित संरक्षित राहणे गरजेचे आहे याबद्दल विचार मांडले .

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. नवनाथ काशीद , अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद शाखा केज यांनी पर्यावरण संवर्धनासाठी जैविक घटकाचे संवर्धन गरजेचे आहे सोबतच भविष्यकालीन महिला सबलीकरण धोरणावर अध्यक्ष समारोपात आपले मत मांडले . या कार्यक्रमात मराठवाडा साहित्य परिषदेचे सहयोगी सदस्य जी.बी.गदळे,एम.डी.

घुले,विक्रम डोईफोडे, जनार्दन सोनवणे,महादेव सुवर्णकार, हरिभाऊ शिंदे,अरुण शिंदे, हनुमंत भोसले,श्रावण कुमार जाधव,माधव गोरे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम डोईफोडे व एम.डी.घुले यांनी केले.

# धम्माच्या आचरणातूनच सुसंस्कृत समाज घडतो –भदंत बुद्धघोष महास्थवीर



शिरजगाव बंड (जमापूर)– अमरावती येथे सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त सावित्रीबाई फुले महिला बहुउद्देशीय संस्था आणि सिद्धार्थ नवयुवक मंडळातर्फे भिक्खू संघाची जाहीर धम्मदेशना आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करताना भदंत बुद्धघोष महास्थवीर यांनी धम्माचे आचरण केल्यास माणूस सुसंस्कृत बनतो,असे प्रतिपादन केले.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की,धम्मराज्य निर्माण करणे हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न होते. परंतु आज समाजात अपेक्षित अशी एकता दिसून येत नाही. महामानवांच्या जयंतीच्या कार्यक्रमांमध्ये काही तरुण डीजेच्या तालावर मद्यप्राशन करून सहभागी होताना दिसतात, ही बाब चिंताजनक असून धम्माच्या शिकवणीला साजेशी नाही. धम्म संयम, शील आणि सदाचार शिकवतो, त्यामुळे समाजातील तरुणांनी योग्य दिशेने वाटचाल करणे आवश्यक आहे.

भदंत बुद्धघोष महास्थवीर पुढे म्हणाले की,काही राजकीय नेते आपल्या मुलांना दारूपासून दूर ठेवतात आणि उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवतात; मात्र हेच नेते बहुजन समाजातील तरुणांना मद्यसंस्कृतीत अडकवण्याचे काम करतात. याकडे समाजाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.आजच्या तरुणांनी शिक्षणासोबत व्यवसायिक दृष्टीकोन स्वीकारून स्वावलंबी बनावे,असेही त्यांनी आवाहन केले.या कार्यक्रमाला छत्रपती संभाजी नगर येथील पूज्य भदंत करुणानंद महाथेरो,भदंत धम्मबोधी थेरो,भदंत एन.धम्मानंद थेरो,भदंत पूर्ण सुमेध थेरो,भिक्खू सीलवंसलंकार, भंते राजरत्न तसेच आर्या संघशीला आर्या अनुला यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शिरजगाव बंड (जमापूर) येथील संविधान चौकातून धम्म रॅली काढून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.यावेळी भदंत करुणानंद महाथेरो यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, धम्मपरिवर्तनाला ६९ वर्षे पूर्ण झाली असली तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेले विचार आपण कितपत स्वीकारले आहेत, याचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. तसेच आपण २२ प्रतिज्ञांचे कितपत पालन करतो, याचाही समाजाने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

मंचावर उपस्थित इतर भिक्खू संघातील मान्यवरांनीही धम्म,शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन याविषयी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन भिक्खू सीलवंसलंकार यांनी केले.या कार्यक्रमास परिसरातील हजारो बौद्ध उपासक–उपासिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.